शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि.पुणे - ४१२४०५
दूरध्वनी क्र.- ०२१३३-२३०२८२
ई मेल - gcoeara@gmail.com
वेबसाईट : www.gcoeara.ac.in

## निविदा सूचना

या महाविद्यालयातील मुलांची व मुलींची खानावळ सुरु करण्यासाठी अनुभवी / नामवंत आणि सक्षम अशा चालक किंवा केटरिंग कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. मुलांची खानावळ व मुलींची खानावळ यासाठी स्वतंत्र निविदा सादर करणे आवश्यक आहे. सदर निविदेच्या अटी व शर्ती, मेनु याबाबतची माहिती संस्थेचे संकेतस्थळ www.gcoeara.ac.in यावर दिलेली आहे. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि. ३१.०५.२०१७ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत आहे. तरी इच्छुकांनी संकेतस्थळावरुन माहिती घेऊन निविदा सादर कराव्या.

( डॉ. ए. एस. पंत )
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन
महाविद्यालय अवसरी (खुर्द)

प्रत- विभागप्रमुख, संगणक अभियांत्रिकी- संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
## अवसरी (खुर्द),ता. आंबेगाव, जि.पुणे - ४१२४०५

दूरध्वनी क्र. ०२१३३-२३०५८२

ई मेल - gcoeara@gmail.com

वेबसाईट : www.gcoeara.ac.in


## मुलांच्या वसतीगृहातील खानावळ व संस्थेसाठी उपहारगृह चालविण्यासाठी निविदा अर्ज

### अ ) अर्जदाराबाबतची व्यवसायासंबंधी माहिती

अर्जदाराचे संपूर्ण नाव - ..................................................

१) अर्जदाराचा संपूर्ण पत्ता- ..................................................

.............................. पिन कोड ................

२) शैक्षणिक पात्रता- ..................................................

३) अ- खानावळ चालविण्याचा अनुभव आहे काय ? होय / नाही

ब- असल्यास कोणत्या संस्थेच्या खानावळीचा ..................................

अनुभव आहे त्याचे नाव पत्ता व दूरध्वनी क्रमांक ..................................

क- खानावळ चालवण्याच्या अनुभवाचे प्रमाणपत्र ( कालावधी व खानावळीच्या क्षमतेचा उल्लेख असावा) सादर केले आहे काय ? होय / नाही

ड- ग्रामीण आरोग्य विभागाचा परवाना जोडला आहे काय ? होय / नाही

इ - अन्न व औषध प्रशासनाचा परवाना जोडला आहे काय ? होय / नाही

४) अर्जदाराविरुध्द कोणत्याही प्रकारची तक्रार /खटला, पोलीस ठाण्यात प्रलंबीत आहे का ? आहे / नाही
असल्यास तपशील दयावा.

( या व्यतिरीक्त अनुभवासंदर्भात माहिती द्यावयाची असल्यास वेगळया पानावर नमुद करावी)

## ब ) निविदा अर्ज

१ ) मुलांच्या दरमहा जेवणाचा दर ( सोबतच्या मेनूकार्डप्रमाणे ) रु. . . . . . . . . . . . . . . .
दोन्ही वेळेला पोटभर जेवण देणे अनिवार्य आहे.

२) अ) एका महिन्याचे किमान ५ पेक्षा जास्त खाडे मान्य असल्यास ती संख्या . . . . . . . . . . . . . . .

ब) एकवेळच्या खाडयाचा दर रु. . . . . . . . . . . . . . . .

३) एका वेळेचा गेस्ट चार्ज (पाहुणे असल्यास) रु. . . . . . . . . . . . . . . .
(पाहुणे म्हणजे संस्थेच्या वसतीगृहात प्रशिक्षणासाठी आलेले व तात्पुरत्या निवासासाठी असलेले विद्यार्थी, वसतीगृहात शासकीय कामाने वास्तव्यात असलेले अधिकारी / कर्मचारी अथवा संस्थेचे अधिकारी / कर्मचारी )

४) उपहारगृहासाठी मेनू व दर
येथे वेगवेगळया पदार्थांचा दर नमूद करावा.

मी खालील सही करणार . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो की, वरीलप्रमाणे निविदा अर्जात माझ्याबद्दल दिलेली माहिती खरी आहे. जर माहिती खोटी आढळल्यास करार रद्द करण्यात यावा. तसेच मी दिलेले दर मंजूर झाल्यास संस्थाप्रमुखांच्या पूर्वपरवानगी शिवाय हया दरामध्ये कोणताही बदल करणार नाही. हया निविदा अर्जाच्या सोबतच्या अटी व शर्ती मला प्राप्त झाल्या असून त्याचे मला आकलन झालेले आहे.

मला संस्थेच्या मुलांच्या वसतीगृहासाठी असलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असून त्याचे अधिन राहून मी वरील दरपत्रक सादर करीत आहे.

अर्जदाराची सही

(अर्जदाराचे नाव - )

अर्जदाराचा संपूर्ण पत्ता (दूरध्वनी क्रमांकासह) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द)

## मुलांच्या वसतीगृहातील खानावळ व संस्थेसाठी उपहारगृह : अटी व शर्ती

१. मुलांच्या वसतीगृहातील खानावळीमध्ये संस्थेसाठीचे उपहारगृह देखील चालवावे लागेल. सर्वसाधारणपणे जेवण देण्याची वेळ दुपारी ९.३० ते दुपारी ११.०० व सायंकाळी ७.०० ते रात्री ९.०० अशी राहील. उपहारगृहाची वेळ सकाळी ७.०० ते ९.०० व सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.०० अशी राहील. फक्त जेवणासाठी खानावळ चालविण्याचे कंत्राट दिले जाणार नाही. उपहारगृह व खानावळ दोन्ही एकाच कंत्राटदारांस चालवावे लागेल. स्वतः खानावळ न चालविता ती चालविण्यासाठी अन्य व्यक्तीची नेमणुक (Sub Contracting) करता येणार नाही, तसे आढळून आल्यास कंत्राट रदद करण्यात येईल.

२. वसतीगृहातील दोन्ही वेळेला जेवण घेण्या-या मुलांची अंदाजे संख्या ३५० ते ३७५ असेल. उपहारगृहामध्ये संस्थेतील एकूण २००० विद्यार्थी / अधिकारी / कर्मचारी यापैकी कोणीही येऊ शकेल

३. खानावळ चालकांकडे ग्रामीण आरोग्य विभागाचा दाखला, अन्न व औषध प्रशासनाचा वैध दाखला इ. कागदपत्रे अनिवार्य आहेत. त्याची प्रत निविदेसोबत जोडावी.

४. खानावळ चाळविण्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. किमान १५० व्यक्तींसाठी मेस चालविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे व तसे प्रमाणपत्रात स्पष्ठ नमूद केलेले असावे.

५. स्वयंपाकासाठीचे स्वयंपाकघर,पाणी कनेक्शन, गॅस कनेक्शनसाठीचे पाईपिंग, स्वयंपाकाची व जेवणासाठी आवश्यक भांडी संस्था पुरवेल. त्याचे भाडे रु. ६५००/- दरमहा करार सुरु झाल्यापासून करार संपेपर्यंत (सुटीचे दिवस धरुन ) खानावळ चालकांनी भरणे आवश्यक आहे. ( फ्रिज कंत्राटदारांनी स्वतःचा वापरवयाचा आहे.)

६. उपहारगृहासाठी लागणारे अतिरिक्त मनुष्यबळ तसेच भांडी यांची सोय कंत्राटदारांनी स्वतः करावयाची आहे.

७. उपहारगृहामध्ये दूध, चहा, कॉफी, शीतपेये तसेच हलके अल्पोपहाराचे पदार्थ (पोहे, शिरा, खिचडी, इडली सांबार, डोसे, सँडवीच, नूडल्स, पॅटीस इत्यादी ) उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

८. केंद्र शासनाच्या आरोग्य मंत्रालयाच्या निर्देशानुसार उपहारगृहामध्ये Junk Food (Potato chips / wafers/Kurkure इत्यादी) तसेच तंबाखूजन्य पदार्थ यांची विक्री करण्यास सक्त मनाई आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत हे पदार्थ विक्रीसाठी ठेवता येणार नाहीत.

९. खानावळ व उपहारगृहामध्ये उपलब्ध असणा-या सर्व अन्नपदार्थांचा दर्जा उत्कृष्ठ असावा. सर्व अन्नपदार्थ ताजे, गरम व स्वच्छ असावेत.

१०. खानावळीतील कर्मचारी यांच्या स्वच्छतेचे कटाक्षाने पालन होणे अनिवार्य आहे.

११. तेल, गहू, तांदूळ, डाळी, कडधान्य, भाज्या इ. जेवणाचे घटक पदार्थ चांगल्या प्रतीचे असणे आवश्यक राहील.

१२. दररोजच्या जेवणामध्ये सोबतच्या मेनूकार्डप्रमाणे मेनू देणे आवश्यक आहे. मेनूमध्ये काही कारणाने बदल अपरिहार्य असल्यास होस्टेल रेक्टरना त्याची पूर्वसूचना द्यावी लागेल.

१३. दरमहा ५ जेवणाचे खाडे ( गैरहजेरी) गृहीत धरण्यात येतील.

१४. कंत्राटदाराने ओला व सुका कचरा इ.ची विल्हेवाट स्वतःची स्वतः करणे आवश्यक राहील. कच-याच्या दुर्गंधीपासून आरोग्यास धोका निर्माण होणार नाही याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच कच-यापासून ड्रेनेज चोक झालेस त्याची दुरुस्ती कंत्राटदारांनी करावयाची आहे. मेस परिसर स्वच्छतेची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

१५. संस्थेच्या अधिकृत विद्यार्थ्यांशिवाय बाहेरील व्यक्तींना खानावळीत प्रवेश देवू नये अथवा त्यांना डबा देण्याची सुध्दा परवानगी नाही. (विद्यार्थ्यांचे पालक किंवा नातेवाईक असल्यास रेक्टर यांच्या परवानगीने गेस्ट चार्ज आकारुन देणे)

१६. रु. २,५०,०००/- ( रु. दोन लाख पन्नास हजार फक्त ) अनामत रक्कम संस्थेत जमा करुनच करार अस्तित्वात येईल.

१७.कराराची मुदत एक वर्ष असेल. तथापी खानावळीच्या व उपहारगृहाच्या त्या वर्षातील कामकाजाचे मूल्यमापन करून पुढील वर्षासाठी मुदतवाढ देण्याचे अधिकार मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना आहेत. कराराची मुदत संपल्यानंतर सर्व साहित्य संस्थेकडे जमा करण्यात यावे. त्यानंतरच कंत्राटदारांची अनामत रक्कम परत केली जाईल.

१८.कंत्राटदारांनी करार व अटीचे मान्यतेचे करारपत्र रु १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करावे लागेल. खानावळीचे व उपहारगृहाचे कामकाजाबाबत कोणतीही तक्रार असल्यास त्याची शहानिशा करुन सदर करार तात्काळ संपुष्टात आणण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना राहतील.

१९.मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांचे सुचनेनुसार खानावळीची व उपहारगृहाची आकस्मिक तपासणी वेळोवेळी करण्यांत येईल. कंत्राटदाराने तपासणीच्यावेळी सहकार्य करावे.

२०.खानावळीमध्ये व उपहारगृहामध्ये मद्यपान / धुम्रपान / अंमली पदार्थांचे सेवन व विक्री करण्यास सक्त मनाई आहे.

२१.खानावळीतील अन्नाचा दर्जा आरोग्यास हितकारक असावा. खानावळीतील अन्नापासून विद्यार्थ्यांना अथवा इतरांना कोणत्याही प्रकारची बाधा झाल्यास त्याची सर्व जबाबदारी खानावळ चालकावर राहील.

२२.कोणतेही कारण न देता सदर निविदा प्रक्रिया रदद करण्याचे अधिकार संस्थेकडे राखीव आहेत.

२३.पॅनकार्डची झेरॉक्स प्रत निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

२४.खानावळीमध्ये कोणत्याही कर्मचा-यास राहण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

२५.खानावळीमध्ये काम करणा-या कर्मचा-यांच्या आरोग्याचा वैद्यकीय दाखला घेऊन त्यांची संपूर्ण माहिती संस्थेस द्यावी लागेल. कर्मचा-यांच्याकडे ओळखपत्र असणे बंधनकारक असेल, तसेच कामासाठी बालकामगार ठेवता येणार नाहीत.

२६.सेवा कर (Service Tax) नोंदणीचे प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

२७.खानावळीच्या जागेचा वापर दुस-या कोणत्याही व्यवसायासाठी करता येणार नाही. तसे आढळून आल्यास करार तत्काळ रद्द केला जाईल.

२८.विद्यार्थांच्या परीक्षेच्या पूर्वतयारी कालावधीदरम्यान व परीक्षेच्या कालावधीमधे तसेच सत्र समाप्तीनंतर खानावळीच्या मासिक दराची आकारणी प्राचार्यांच्या सूचनेनुसार करावी लागेल.

२९. विद्यार्थ्यांकडून जेवणाच्या मासिक दराच्या वसूलीची पूर्ण जबाबदारी कंत्राटदाराचीच राहील. उपहारगृहामध्ये विक्री केलेल्या पदार्थांची किंमत विक्रीच्या वेळेसच घेण्याची दक्षता कंत्राटदारांनी घ्यायची आहे.

३०.उपहारगृह व खानावळीची वेळ प्राचार्य, रेक्टर व विद्यार्थ्यांच्या चर्चेनुसार बदलता येईल.

३१.निविदा सादर करताना रु.२०००/- ( परत न मिळणारी निविदा फॉर्म फी ) संस्थेत रोखीने जमा करुन त्याची शासकीय पावती निविदेसोबत जोडावी. शासकीय पावती जोडलेली नसल्यास निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

( डॉ. ए. एस. पंत )
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, (अवसरी खुर्द)

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
## अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि.पुणे - ४१२४०५

दूरध्वनी क्र. ०२१३३-२३०५८२ ई मेल - gcoeara@gmail.com

वेबसाईट : www.gcoeara.ac.in


## मुलींच्या वसतीगृहातील खानावळीसाठी निविदा अर्ज

### अ ) अर्जदाराबाबतची व्यवसायासंबंधी माहिती

अर्जदाराचे संपूर्ण नाव - .................................................................

१) अर्जदाराचा संपूर्ण पत्ता- ...........................................................

.................................... पिन कोड ....................

२) शैक्षणिक पात्रता- ......................................................................

३) अ- खानावळ चालविण्याचा अनुभव आहे काय ? होय / नाही

ब- असल्यास कोणत्या संस्थेच्या खानावळीचा ................................................
अनुभव आहे त्याचे नाव पत्ता व दूरध्वनी क्रमांक ..................................................

क- खानावळ चालवण्याच्या अनुभवाचे प्रमाणपत्र ( कालावधी व खानावळीच्या क्षमतेचा उल्लेख असावा) सादर केले आहे काय ? होय / नाही

ड- ग्रामीण आरोग्य विभागाचा परवाना जोडला आहे काय ? होय / नाही

इ - अन्न व औषध प्रशासनाचा परवाना जोडला आहे काय ? होय / नाही

४) अर्जदाराविरुध्द कोणत्याही प्रकारची तक्रार / खटला पोलीस ठाण्यात प्रलंबीत आहे का ? आहे / नाही
असल्यास तपशील दयावा.

( या व्यतिरीक्त अनुभवासंदर्भात माहिती द्यावयाची असल्यास वेगळया पानावर नमुद करावी)

# ब ) निविदा अर्ज

१ ) मुलींचे दरमहा जेवणाचा दर ( सोबतच्या मेनूकार्डप्रमाणे ) दोन्ही वेळेला पोटभर जेवण देणे अनिवार्य आहे. रु. . . . . . . . . . . . . . . .

२) अ) एका महिन्याचे किमान ५ पेक्षा जास्त खाडे मान्य असल्यास ती संख्या . . . . . . . . . . . . . . . .

ब) एकवेळच्या खाडयाचा दर रु. . . . . . . . . . . . . . . .

३) एका वेळेचा गेस्ट चार्ज (पाहुणे असल्यास) (पाहुणे म्हणजे संस्थेच्या वसतीगृहात प्रशिक्षणासाठी आलेले व तात्पुरत्या निवासासाठी असलेले विद्यार्थी, वसतीगृहात शासकीय कामाने वास्तव्यात असलेले अधिकारी / कर्मचारी अथवा संस्थेचे अधिकारी / कर्मचारी ) रु. . . . . . . . . . . . . . . .

४) नाष्टयाचा मेनू व दर (नाष्टा घेणे ऐच्छीक) रु. . . . . . . . . . . . . . . .

५) चहाचा दर ( चहा घेणे ऐच्छीक ) रु. . . . . . . . . . . . . . . .

मी खालील सही करणार . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो की, वरीलप्रमाणे निविदा अर्जात माझ्याबद्दल दिलेली माहिती खरी आहे. जर माहिती खोटी आढळल्यास करार रद्द करण्यात यावा. तसेच मी दिलेले दर मंजूर झाल्यास संस्थाप्रमुखांच्या पूर्वपरवानगी शिवाय हया दरामध्ये कोणताही बदल करणार नाही. हया निविदा अर्जाच्या सोबतच्या अटी व शर्ती मला प्राप्त झाल्या असून त्याचे मला आकलन झालेले आहे.

मला संस्थेच्या मुलींच्या वसतीगृहासाठी असलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असून त्याचे अधिन राहून मी वरील दरपत्रक सादर करीत आहे.

अर्जदाराची सही

(अर्जदाराचे नाव - )

अर्जदाराचा संपूर्ण पत्ता (दूरध्वनी क्रमांकासह) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द)
## मुलींच्या वसतीगृहातील खानावळ : अटी व शर्ती

१. मुलींच्या खानावळीमध्ये महिला कर्मचारीच नेमणे आवश्यक राहील. फक्त अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्येच प्राचार्य व रेक्टर यांच्या पूर्वपरवानगीने या अटीमधून सूट देण्याचा विचार करता येईल.

२. वसतीगृहातील दोन्ही वेळेला जेवण घेण्या-या मुलींची अंदाजे संख्या २५० ते ३०० असेल, व चहा व नाष्टा घेणे ऐच्छीक राहील.

३. खानावळ चालकांकडे ग्रामीण आरोग्य विभागाचा दाखला, अन्न व औषध प्रशासनाचा वैध दाखला इ. कागदपत्रे असणे अनिवार्य आहेत. त्याची प्रत निविदेसोबत जोडावी. स्वतः खानावळ न चालविता ती चालविण्यासाठी अन्य व्यक्तीची नेमणुक (Sub Contracting) करता येणार नाही, तसे आढळून आल्यास कंत्राट रदद करण्यात येईल.

४. खानावळ चाळविण्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. किमान १५० व्यक्तींसाठी मेस चालविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे व तसे प्रमाणपत्रात स्पष्ठ नमूद केलेले असावे.

५. स्वयंपाकासाठीचे स्वयंपाकघर,पाणी कनेक्शन, गॅस कनेक्शनसाठीचे पाईपिंग, स्वयंपाकाची व जेवणासाठी आवश्यक भांडी संस्था पुरवेल. त्याचे भाडे रु. ६५००/- दरमहा करार सुरु झाल्यापासून करार संपेपर्यंत (सुटीचे दिवस धरुन ) खानावळ चालकांनी भरणे आवश्यक आहे. ( फ्रिज कंत्राटदारांनी स्वतःचा वापरवयाचा आहे.)

६. तेल, गहू, तांदूळ, डाळी, कडधान्य, भाज्या इ. जेवणाचे घटक पदार्थ चांगल्या प्रतीचे असणे आवश्यक राहील. बनविलेले सर्व अन्नपदार्थ ताजे, स्वच्छ व गरम असावेत.

७. दररोजच्या जेवणामध्ये सोबतच्या मेनूकार्डप्रमाणे मेनू देणे आवश्यक आहे. मेनूमध्ये काही कारणाने बदल अपरिहार्य असल्यास होस्टेल रेक्टरना त्याची पूर्वसूचना द्यावी लागेल.

८. दरमहा ५ जेवणाचे खाडे ( गैरहजेरी) गृहीत धरण्यात येतील.

९. कंत्राटदाराने ओला व सुका कचरा इ.ची विल्हेवाट स्वतःची स्वतः करणे आवश्यक राहील. कच-याच्या दुर्गंधीपासून आरोग्यास धोका निर्माण होणार नाही याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच कच-यापासून ड्रेनेज खराब झालेस त्याची दुरुस्ती कंत्राटदारांनी करावयाची आहे. मेस परिसर स्वच्छतेची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

१०. संस्थेच्या अधिकृत विद्यार्थीनीशिवाय बाहेरील व्यक्तींना खानावळीत प्रवेश देवू नये अथवा त्यांना डबा देण्याची सुध्दा परवानगी नाही.(विद्यार्थीनीचे पालक किंवा नातेवाईक असल्यास रेक्टर यांच्या परवानगीनंतर गेस्ट चार्ज आकारुन देणे)

११. रु. १,५०,०००/- ( रु. एक लाख पन्नास हजार फक्त ) अनामत रक्कम संस्थेत जमा करुनच करार अस्तित्वात येईल.

१२. कराराची मुदत एक वर्ष असेल. तथापी खानावळीच्या त्या वर्षातील कामकाजाचे मूल्यमापन करुन पुढील वर्षासाठी मुदतवाढ देण्याचे अधिकार मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना आहेत. कराराची मुदत संपल्यानंतर सर्व साहित्य संस्थेकडे जमा करण्यात यावे. त्यानंतरच कंत्राटदारांची अनामत रक्कम परत केली जाईल.

१३. कंत्राटदारांनी करार व अटीचे मान्यतेचे करारपत्र रु १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करावे लागेल. खानावळीचे कामकाजाबाबत कोणतीही तक्रार असल्यास त्याची शहानिशा करुन सदर करार तात्काळ संपुष्टात आणण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना राहतील.

१४. मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांचे सुचनेनुसार खानावळीची आकस्मिक तपासणी वेळोवेळी करण्यांत येईल. कंत्राटदाराने तपासणीच्यावेळी सहकार्य करावे.

१५. खानावळीमध्ये मद्यपान / धुम्रपान / अंमली पदार्थांचे सेवन व विक्री करण्यास सक्त मनाई आहे.

१६. खानावळीतील अन्नाचा दर्जा आरोग्यास हितकारक असावा. खानावळीतील अन्नापासून विद्यार्थीनींना अथवा इतरांना कोणत्याही प्रकारची बाधा झाल्यास त्याची सर्व जबाबदारी खानावळ चालकावर राहील.

१७. कोणतेही कारण न देता सदर निविदा प्रक्रिया रदद करण्याचे अधिकार संस्थेकडे राखीव आहेत.

१८. पॅनकार्डची झेरॉक्स प्रत निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

१९. खानावळीमध्ये कोणत्याही कर्मचा-यास राहण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

२०. खानावळीमध्ये काम करणा-या कर्मचा-यांच्या आरोग्याचा वैद्यकीय दाखला घेवून त्यांची संपूर्ण माहिती संस्थेस द्यावी लागेल. कर्मचा-यांच्याकडे ओळखपत्र असणे बंधनकारक असेल, तसेच कामासाठी बालकामगार ठेवता येणार नाहीत.

२१. सेवा कर (Service Tax) नोंदणीचे प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

२२. खानावळीच्या जागेचा वापर दुस-या कोणत्याही व्यवसायासाठी करता येणार नाही. तसे आढळून आल्यास करार तत्काळ रद्द केला जाईल.

२३. विद्यार्थीनींच्या परीक्षेच्या पूर्वतयारी कालावधीदरम्यान व परीक्षेच्या कालावधीमधे तसेच सत्र समाप्तीनंतर खानावळीच्या मासिक दराची आकारणी प्राचार्यांच्या सूचनेनुसार करावी लागेल.

२४. विद्यार्थीनींकडून जेवणाच्या मासिक दराच्या वसूलीची पूर्ण जबाबदारी कंत्राटदाराचीच राहील.

२५. खानावळीची वेळ प्राचार्य, रेक्टर व विद्यार्थीनींच्या चर्चेनुसार ठरविली जाईल.

२६. निविदा सादर करताना रु.२०००/- ( परत न मिळणारी निविदा फॉर्म फी ) संस्थेत रोखीने जमा करुन त्याची शासकीय पावती निविदेसोबत जोडावी. शासकीय पावती जोडलेली नसल्यास निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

( डॉ. ए. एस. पंत )
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, (अवसरी खुर्द)

# मुलांचे वसतिगृह मेनू कार्ड २०१७-१८

| | सकाळ | | | | संध्याकाळ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वार | सुकी भाजी | पातळ भाजी | वरण भात | सलाड | सुकी भाजी | पातळ भाजी | गोड | वरण भात | सलाड |
| सोम | फ्लॉवर | वाटणा | मुग वरण + भात | गाजर | बटाटा + वांगी | पनीर मसाला | गुलाबजामून (४ सेमी व्यास, ०४नग) | दाल तडका आणि जीरा राईस | कोशिंबीर + भजी (पालक/मिरची /कांदा/ मुगाच्या डाळीची) |
| | | | | | | पनीर कोफ्ता | श्रीखंड (घट्ट) (०१ वाटी) | | |
| | | | | | | काजू करी | बासुंदी | | |
| | | | | | | मटार पनीर | जिलेबी(०४नग | | |
| मंगळ | गवार | भरलेली मसाला वांगी | तूर वरण + भात | गाजर+कांदा+बीट | कोबी | छोले | -------- | मुग वरण + भात | गाजर+कांदा+बीट |
| बुध | शिमला मिरची | बटाटा | मुग वरण + भात | काकडी+कांदा+बीट | दोडका/ मुगाची डाळ | शेवगा | -------- | तूर वरण + भात | काकडी+कांदा+बीट |
| गुरु | शेपू (कापून+डाळ टाकून) | राजमा/ वाल | मुग वरण + भात | टोमॅटो+गाजर+बीट | ----- | पाव भाजी | खीर (शेवया)/ शिरा | मसाले भात | टोमॅटो+गाजर+बीट |
| | | | | | ----- | आलूपराठा+ शेंगदाणा/ खोबऱ्याची ओली चटणी | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साबुदाणा खिचडी /साबुदाणा वडा | | | दोन वेगवेगळी फळे | -----<br>-----<br>----- | मिसळ पाव<br>पुरी आणि छोले भाजी<br>इडली+ सांबर | | | |
| **शुक्र** | कारले/ ऋतूनुसार पालेभाजी (कापून+डाळ टाकून) | मटकी | तूर वरण + भात | टोमॅटो+कांदा+बीट | मसाला भेंडी | मसूर | -------- | मुग वरण + भात | टोमॅटो+कांदा+बीट |
| **शनी** | पिवळा बटाटा | कढी | दाल तडका आणि जीरा राईस | गाजर+कांदा+बीट | हिरव्या मुगाची/मटकी उसळ (मोड आलेले) | बटाटा + वाटणा (एकत्र) | -------- | व्हेज बिर्याणी/ पुलाव | गाजर+कांदा+बीट |
| **रवी** | टोमॅटोची चटणी | वरणफळ | मसाले भात | काकडी+कांदा+बीट | मेथी (डाळ टाकून) | चवळी/छोले | -------- | सांबर+ भात | काकडी+कांदा+बीट |

**रोज सकाळ आणि संध्याकाळ :-** लोणचे ( कैरी / लिंबू /मिरची/ मिक्स), एक पापड( उडीदाचे/ नाचणीचे/ तांदळाचे), चटणी ( शेंगदाणा / खोबरे/ जवस / कारळ ), दही(घट्ट) .

गोड पदार्थ चांगल्या दर्जाचे व बंद पॅकींग मधील असावेत.

सर्व भाज्या व सलाड ताजे असावे.

# मुलींचे वसतिगृह मेनू कार्ड २०१७-१८

| | सकाळ | | | | संध्याकाळ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वार | सुकी भाजी | पातळ भाजी | वरण भात | सलाड | सुकी भाजी | पातळ भाजी | गोड | वरण भात | सलाड |
| सोम | फ्लॉवर | वाटणा | मुग वरण + भात | गाजर | बटाटा + वांगी | पनीर मसाला | गुलाबजामून (४सेमी व्यास, ०४नग) | दाल तडका आणि जीरा राईस | कोशिंबीर+ भजी (पालक/कांदा/ मुगाच्या डाळीची) |
| | | | | | | पनीर कोफ्ता | श्रीखंड (घट्ट) (०१ वाटी) | | |
| | | | | | | काजू करी | बासुंदी | | |
| | | | | | | मटार पनीर | जिलेबी(०४नग | | |
| मंगळ | गवार | भरलेली मसाला वांगी | तूर वरण + भात | टोमॅटो | कोबी | छोले | -------- | मुग वरण + भात | गाजर |
| बुध | शिमला मिरची | बटाटा | मुग वरण + भात | काकडी | दोडका/ मुगाची डाळ | शेवगा | -------- | तूर वरण + भात | गाजर |
| गुरु | शेपू (कापून+डाळ टाकून) | राजमा/ वाल | मुग वरण + भात | टोमॅटो | ----- | पाव भाजी | खीर (शेवया)/ शिरा | मसाले भात | ------- |
| | | | | | ----- | आलूपराठा+ शेंगदाणा/ खोबऱ्याची ओली चटणी | | | |

29/04/17

कु[illegible]

शा. अ. [illegible]

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साबुदाणा खिचडी /साबुदाणा वडा | | | दोन वेगवेगळी फळे | -----<br>-----<br>----- | मिसळ पाव<br>पुरी आणि छोले भाजी<br>इडली+ सांबर | | | |
| शुक्र | कारले/ ऋतूनुसार पालेभाजी (कापून+डाळ टाकून) | मटकी | तूर वरण + भात | बीट | मसाला भेंडी | मसूर | -------- | मुग वरण + भात | टोमॅटो |
| शनी | पिवळा बटाटा | कढी | दाल तडका आणि जीरा राईस | काकडी | हिरव्या मुगाची/मटकी उसळ (मोड आलेले) | बटाटा + वाटणा (एकत्र) | -------- | व्हेज बिर्याणी/ पुलाव | गाजर |
| रवी | टोमॅटोची चटणी | वरणफळ | मसाले भात | बीट | मेथी (डाळ टाकून) | चवळी | -------- | सांबर+ भात | काकडी |

रोज सकाळ आणि संध्याकाळ :- लोणचे ( कैरी / लिंबू /मिरची/ मिक्स)

रोज सकाळ आणि संध्याकाळ :- दही(घट्ट)आणि एक पापड

रोज संध्याकाळ :- चटणी ( शेंगदाणा / खोबरे/ जवस / कारळ )

गोड पदार्थ चांगल्या दर्जाचे व बंद पॅकींग मधील असावेत.

सर्व भाज्या व सलाड ताजे असावे.

पोळ्या घडी घालून केलेल्या असाव्यात.

29/04/17